**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** उमेरखेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0014 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/01/2024 03:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 09/01/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/01/2024

**Time From (वेळेपासून):** 14:54 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:28 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/01/2024 **Time (वेळ):** 02:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 004

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/01/2024 02:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभ, उमरखेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. सुभाष पजाजी बरडे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1966
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुळावा ,उमरखेड ,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुळावा ,उमरखेड ,उमेरखेड,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-8381019601

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचीन शेषराव मुटकुळे | | | 1. उध्र्व पैनगंगापाटबंधारे उमरखेड, उमरखेड,उमेरखेड,यवतमाळ, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | नगदी 1500 | 1,500.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,500.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद मी सुभाश पुंजाजी बरडे, वय 58 वर्ष, धंदा- सेवानिवृत्त कनिष्ठ सहायक पंचायत समिती कार्यालय उमरखेड जि. यवतमाळ रा. मु. पोस्ट मुळावा ता. उमरखेड जि. यवतमाळ नमुद पत्यावर माझे कुटुंबासह राहात असुन माझे शिक्षण बि.ए. पर्यंत झाले आहे. मी दिनांक 09/01/2024 रोजी अॅन्टी करेप्शन ब्युरो कार्यालय यवतमाळ येथे संपर्क करून सांगीतले की, लोकसेवक सचीन शेषराव मुटकुळे, पद-मोजणीदार, उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड यांचे विरूध्द लाच मागणीची तक्रार पोलीस उप अधीक्षक उत्तम नामवाडे यांचे समक्ष दिली, ती खालील प्रमाणे आहे.तक्रार प्रति,मा.पोलीस उपअधीक्षक लाचलुचपत प्रतीबंधक विभाग,यवतमाळ. अर्जदार:- श्री. सुभाष पजाजी बरडे, वय 58 वर्ष, धंदा सेवानिवृत्त (पद कनिष्ठ सहायक पंचायत समिती कार्यालय उमरखेड जिल्हा यवतमाळ) रा. मु पोस्ट मुळावा ता.उमरखेड जिल्हा यवतमाळ मो.क्र. 8381019601मी दिनांक 15/12/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय यवतमाळ येथे हजर येवुन माझे तक्रारी बाबत मा. पोलीस उपअधिक्षक श्री. नामवाडे साहेब यांना भेटलो होतो. परंतु त्यादिवषी माझे जवळ तक्रारीसंबंधीचे कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे पोलीस उपअधिक्षक साहेबांनी मला तक्रारीसंबंधीचे कागदपत्र प्राप्त झाल्यानंतर संपर्क साधण्यास सांगितले होते त्याप्रमाणे कागदपत्र प्राप्त झाल्या नंतर माझे महत्वाचे वैयक्तीक काम झाल्या नंतर मी दिनांक 08/01/2024 रोजी मा. पोलीस उपअधिक्षक श्री. नामवाडे साहेब यांना संपर्क सांधुन कागदपत्र प्राप्त झाल्या बाबत माहीती दिली व मी तक्रार देणेकरीता तयार आहे असे सांगितले असता साहेबांनी मला दिनांक 09/01/2024 रोजी उमरखेड येथे आम्ही पंचासह हजर येवुन तुमची तक्रार नोंदवुन घेवु तुम्ही उमरखेड येथे हजर राहा असे सांगितले. यानंतर मी दिनांक 09/01/2024 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.नामवाडे व पंच क्रमांक 1) श्री.विल्सन विठठल उमरीकर, अव्वल कारकुन व 2) श्री. केतन रमेशराव कांबळे, महसुन सहायक यांची तसेच पडताळणी पथकाची उमरखेड शहरा बाहेर बायपास येथे भेट घेतली व मी पोलीस उपअधीक्षक श्री.नामवाडे यांना माझी तक्रार पंचासमक्ष सांगितली ती पुढील प्रमाणे "मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहत असुन माझे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले असुन मला मराठी, हिंदी भाषा लिहीता, वाचता येते. माझे वडीलोपार्जीत ग्राम तिवरंग शेत षिवारात सर्वे क्रमांक 68 मध्ये 3.24 हेक्टर कोरडवाहु सामाईक शेती असुन सदरची शेतीची हिषेवाटणी करावयाची असल्याने सदर हिशेवाटणी करीता मी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प कार्यालय उमरखेड येथे दिनांक 14/12/2023 रोजी जाउन श्री.सचिन मुटकूळे, मोजणीदार यांचेकडे जमीन उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याचे प्रमाणपत्र मिळणेकरीता फाईल तयार करून दाखविली असता त्यांनी मला उर्ध्व पेनगंगा प्रकल्प कार्यालय ईसापुर येथील श्री. लक्ष्मण जाधव, बिट प्रमुख यांचेकडे फाईल देउन स्थळ पाहणी अहवाल तयार करणेकरीता पाठविले. यानंतर दिनांक 15/12/2023 रोजी मी ईसापुर कार्यालयात जाउन श्री.लक्ष्मण जाधव, बिट प्रमुख यांना भेटलो व त्यांना माझी फाईल दिली असता श्री.जाधव यांनी शेतामध्ये येउन स्थळ पाहणी केली व तसा अहवाल तयार करून मला घेउन उमरखेड कार्यालयात आले. यानंतर श्री.लक्ष्मण जाधव, बिट प्रमुख यांनी माझे प्रकरणाची फाईल श्री.सचिन मुटकूळे, मोजणीदार यांना दिली असता श्री.सचिन मुटकूळे यांनी मला म्हटले की, "तुमच्या फाईलवर नांदेड येथे जाउन उप विभागीय अभियंता साहेबांची सही आणावी लागते तेव्हाच तुम्हाला तुमची जमीन उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याचे प्रमाणपत्र भेटणार त्यासाठी मला खर्च येणार तर तुम्ही मला 1500/- रूपये दया" तेव्हा मी त्यांना "माझे जवळ पैसे नाही" असे म्हटले असता त्यांनी मला म्हटले की, "आता तुम्ही पाहुन घ्या काम केव्हा करायचे, जाउ दया सध्याचे 500/- रूपये देउन दया" असे म्हटले असता मी नाईलाजाने श्री. सचिन मुटकूळे यांना 500/- रूपये दिले. यानंतर श्री.मुटकूळे यांनी मला म्हटले की, "तुमचे प्रमाणपत्र तयार करून आणतो तेव्हा मला 1500/- रूपये देउन देजा" असे म्हटले असता मी नाईलाजाने त्यांना हो म्हणुन तेथुन निघुन आलो. त्यानंतर लोकसेवक श्री. सचिन मुटकुळे यांनी मागील काही दिवसांपासुन वारंवार मला फोनदवारे संपर्क करून लाचेची मागणी केली. तेव्हा मी वैयक्तीक कामानिमीत्त बाहेरगावी असल्याचे सांगीतले. तरी उर्ध्व पेनगंगा प्रकल्प कार्यालय उमरखेड येथील श्री.सचिन मुटकूळे, मोजणीदार हे मला माझे वडीलोपार्जीत ग्राम तिवरंग शेत शिवारात सर्वे क्रमांक 68 मध्ये 3.24 हेक्टर कोरडवाहु

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता 1,500/- रूपये लाचेची मागणी करीत आहे. मला त्यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी त्यांचे विरुध्द आज रोजी लाच मागणीची तक्रार देत आहे. माझी व श्री.सचिन मुटकूळे, मोजणीदार यांचे मध्ये दुष्मनी नसुन देवाणघेवाणीचा उसणवारीचा कोणताही व्यवहार आमचे मध्ये नाही. तरी त्यांनी मला लाचेची मागणी केल्यास व स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी"अशी तक्रार दिली. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी दोन्ही पंचाना माझी व मला पंचाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी पंचांना माझी तोंडी तक्रार सविस्तर सांगितली. पोलीस उप अधीक्षक श्री. नामवाडे यांनी माझे हस्ताक्षरातील लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. माझी तोंडी व लेखी तक्रारीतील मजकुर एकच असल्याची खात्री झाल्याने दोन्ही पंचांनी व पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली व पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी मला सांगितले की, कनिष्ठ लिपीक श्री. सचिन मुटकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कामासंबधाने चर्चा करावी. यावेळी पडताळणी कारवाई दरम्यान होणारे संभाषण हे व्हॉईस रेकॉर्डरव्दारे सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी. मेमरी कार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत होणार असल्याचे सांगुन सविस्तर कार्यवाही मला व पंचाना समजावुन सांगीतली. लगेच पडताळणी पुर्व पंचनामा पंचासमक्ष करण्यात आला व माझे विनंतीवरुन तक्रारीची पडताळणी आज दिनांक 09/01/2024 रोजी करण्याचे ठरले. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सॅनडीस्क कंपनीचे 32 जीबीचे मेमरी कार्ड टाकले व व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळ्यात शर्टाचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 14/54 वा. ची होती. मला व पंच क्र. 1) श्री. उमरीकर यांना माझेकडील दुचाकी वाहनाने मोजणीदार श्री. मुटकुळे यांचे उमरखेड येथील उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड कार्यालय कडे रवाना केले. पंच क्र. 2) श्री. कांबळे हे पडताळणी पथकाजवळ थांबुन होते. मी पंच क्र. 1 यांचेसह उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड कार्यालय येथे जावुन पंचा समक्ष श्री. मुटकुळे यांची भेट घेतली व त्यांचे सोबत कामासंबंधाने चर्चा केली. चर्चेदरम्यान श्री. मुटकुळे, मोजणीदार यांनी पंचासमक्ष मला माझे वडीलोपार्जीत ग्राम तिवरंग शेत शिवारात सर्वे क्रमांक 68 मध्ये 3.24 हेक्टर कोरडवाहु उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता 1500/- रूपये लाचेची मागणी केली व लाच रक्कम आज दिनांक 09/01/2024 रोजी लवकर स्विकारण्याचे मान्य केले. यानंतर मी, व पंच क्र. 1) श्री. उमरीकर यांचेसह पडताळणी पथकाजवळ परत आलो. पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर घेउन बंद केला, ती वेळ 15/15 वाजताची होती. यानंतर विचारल्यावरून मी व पंच क्र. 1 यांनी घडलेली सविस्तर हकीकत पंचासमक्ष सांगितली. व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. लोकसेवक मुटकुळे यांनी लाच रक्कम लवकर घेवुन बोलाविल्याने सर्वानुमते सापळा कारवाई करण्याचे ठरले.यानंतर दिनांक 09/01/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांचे सुचनेवरून पंच व मला ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्रावायलेट लॅम्पचे गुणधर्म समजावुन सांगितले व मी कारवाई दरम्यान दिलेल्या 500/- रूपये दराच्या 03 नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावुन माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या व मोजणीदार श्री. मुटकुळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास मी माझा डावा हात डोक्यावरून फिरवावा, असा ईषारा सांगीतला. यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी सिलबंद असलेले सॅनडिस्क कंपनीचे 32 जी.बी.मेमरी कार्ड काढले व व्हाईस रेकॉर्डर मध्ये माझे व पंचासमक्ष टाकले. सविस्तर सापळापुर्वची कारवाई करण्यात आली.यानंतर पोलीस उप अधीक्षक नामवाडे यांनी सापळा कार्यवाही करायचे असे सांगुन व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन माझे गळ्यात शर्टाचे आतमध्ये लटकविला, ती वेळ 16/21 वा. ची होती. मला व पंच क्र. 1) श्री. उमरीकर यांना माझेकडील दुचाकी वाहनाने मोजणीदार श्री. मुटकुळे यांचे उमरखेड येथील उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड कार्यालय कडे रवाना केले. पोलीस उप अधीक्षक व कर्मचारी हे शासकिय चारचाकी वाहनाने माझे मागे मागे रवाना झाले. मी पंच क्र. 1 सह उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड येथील कार्यालय येथे गेलो असता, मला कार्यालयामध्ये श्री. मुटकुळे मोजणीदार हे दिसले नाही. त्यामुळे मी तेथील कार्यालयीन कर्मचारी यांना विचारणा केली असता, त्यांनी मोजणीदार श्री. मुटकुळे हे बाहेर असल्याचे सांगीतले तेव्हा मी त्यांना श्री. मुटकुळे यांना फोन करण्यास सांगीतले त्यांनी फोन करून मुटकुळे यांना बरडे भेटायला आले आहे असे सांगीतल्याने थोडयाच वेळात मुटकुळे हे त्यांचे कार्यालयामध्ये आले मी त्यांचे मागे त्यांचे कक्षात गेलो व त्यांची भेट घेतली व पंच क्र. 1 श्री. उमरीकर कार्यालयाचे बाहेर थांबले., व सापळा पथक कार्यालयाचे आजुबाजुला हजर होते. श्री. मुटकुळे मोजणीदार यांनी मला ईशा-याने याने लाचेची मागणी केली असता मी माझे पॅन्टच्या खिश्यामध्ये ठेवलेली ॲन्थ्रासीन पावडर लागलेली लाचेची रक्कम 1500/- रुपये माझे उजवे हाताने बाहेर काढुन श्री. मुटकुळे यांना दिली असता, यांनी 1500/- रूपये लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे शर्टचे समोरील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली व लगेच ति रक्कम त्यांचे टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवली व मी तेथुन निघुन कार्यालया बाहेर आलो व मी माझा डावा हात डोक्यावर वारंवार फिरवला व पुर्वनियोजीत ईशारा

सापळा पथकास केला. लगेच पोलीस उप अधीक्षक नामवाडे व पथकातील कर्मचारी यांनी तेथे येऊन श्री. मुटकुळे मोजणीदार यांचे दोन्ही हात पकडुन त्यांना ताब्यात घेतले व माझेजवळील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेउन बंद केला, ती वेळ 16/28 वा. होती. लाचेच्या नोटांचे क्रमांक तपासुन पाहण्यात आले. विश्रामगृह उमरखेड येथे मोजणीदार श्री. मुटकुळे यांचे हात, लाचेच्या नोटा व माझे हात अल्ट्राव्हॉईलेट दिव्यांचे प्रकाशात तपासण्यात आले. आरोपी लोकसेवक श्री. सचीन शेषराव मुटकुळे, मोजणीदार यांनी दिनांक 09/01/2024 रोजी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष माझे वडीलोपार्जीत ग्राम तिवरंग शेत शिवारात सर्वे क्रमांक 68 मध्ये 3.24 हेक्टर कोरडवाहु उर्ध्व पैनगंगा प्रकल्पांच्या लाभक्षेत्रामध्ये येत नसल्याचे प्रमाणपत्र देण्याकरीता 1500/- रूपये लाचेची मागणी करून दिनांक 09/01/2024 रोजी 14/54 वाजता ते 16/28 वाजता कार्यवाही दरम्यान आ.लो.से. सचीन शेषराव मुटकुळे, लिपीक टंकलेखक यांनी उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02 उमरखेड येथील कार्यालयात माझेकडुन पंचासमक्ष 1500/- रूपये लाच रक्कम स्विकारली, त्यावेळी पोलीस उप अधीक्षक नामवाडे व स्टाफ यांनी त्यांना लाच रकमेसह रंगेहात पकडले. सविस्तर कार्यवाही दिनांक 09/01/2024 रोजीचे पंचनामा प्रमाणे करण्यात आली. त्यावरुन आ.लो.से. सचीन शेषराव मुटकुळे, वय 40 वर्ष, पद लिपीक टंकलेखक, नेमणुक उर्ध्व पैनगंगा पाटबंधारे उपविभाग क्र. 02, कार्यलय उमरखेड, ता. उमरखेड जिल्हा यवतमाळ यांचेविरूध्द कायदेशीर कारवाईस्तव तक्रार देत आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
bharat vithhalrao chapaitkar
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): psi
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

स्टेशन डायरी अंमलदार
पो.स्टे. उमरखेड जि.यवतमाळ
07231/237123

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SHANKAR CHINTAM/
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN74980

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**